# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## मा. परिवहन समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. १३/९/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केलेल्या विशेष बैठकीचे इतिवृत्त.

---

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मा. विभागीय आयुक्त यांचे पत्र क्र. साशा/कार्या–३/नपा/–२/पीठासीअधि/२०१७, दिनांक २१/८/२०१७ अन्वये, उल्हासनगर महानगरपालिका, परिवहन समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका परिवहन समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलविणेत आलेली आजची विशेष बैठक सकाळी ११.३० वाजता मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करणेत आली. सदर सभेस खालील परिवहन समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी यांनी केली.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | श्री. मोहन हरीराम रामवाणी (लास्सी) | हजर |
| २ | श्रीमती कांचन अमर लुंड | हजर |
| ३ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी | गैरहजर |
| ४ | श्री. राजु काशिराम चिकणे | गैरहजर |
| ५ | श्री. रामजीत गजई पाल | हजर |
| ६ | श्री. कुलदीप गुरुदाससिंग ऐलसिघांनी | हजर |
| ७ | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा | हजर |
| ८ | श्री. भगवान नारायण मोहिते | गैरहजर |
| ९ | श्री. किसन प्रितमदास भाटीया | हजर |
| १० | श्री. दिपक दयालदास छतलानी | हजर |
| ११ | श्री. मनोज कैलाशनाथ पाटील | हजर |
| १२ | श्री. भावेश कुंदनदास चेलानी | हजर |
| १३ | श्री. अंबादास गोरख पालवे | हजर |

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील खालीलप्रमाणे विषयाचे वाचन केले.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २७ मधील तरतुदीनुसार मा. परिवहन समितीच्या सदस्यांपैकी एका सदस्याची सन २०१७—१८ साठी सभापती परिवहन समिती म्हणुन निवड करणे.**

निर्धारीत कार्यक्रमानुसार दिनांक ८/९/२०१७ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत परिवहन समिती सभापती पदाच्या निविडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले ३ नामनिर्देशनपत्रे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक १३/९/२०१७ रोजी सकाळी ११.३३ मि. सादर करण्यात आले. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. चेलानी बानीश कुंदन | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा | श्री. मनोज कैलाशनाथ पाटील |
| २ | श्री. भावेश कुंदनदास चेलानी | श्री. रामजीत गजई पाल | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा |
| ३ | श्री. भावेश कुंदनदास चेलानी | श्री. मोहन हरीराम रामनानी (लास्सी) | श्री. मनोज कैलाशनाथ पाटील |

तद्नंतर मा. पीठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले व सदर नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम सकाळी ११.३५ मि. सुरु करणेत आले.

१. सर्वप्रथम **श्री. चेलानी बानीश कुंदन** यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. चेलानी बानीश कुंदन यांच्या नामनिर्देशनपत्रावर **सुचक** म्हणून परिवहन समिती सदस्य **श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा** यांनी स्वाक्षरी केली आहे व **अनुमोदक** म्हणून **श्री. मनोज कैलाशनाथ पाटील** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार,सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पूर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. चेलानी बानीश कुंदन यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

२. **श्री. भावेश कुंदनदास चेलानी** यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. भावेश कुंदनदास चेलानी यांच्या नामनिर्देशनपत्रावर **सुचक** म्हणुन परिवहन समिती सदस्य **श्री. रामजीत गजई पाल** यांनी स्वाक्षरी केली आहे व **अनुमोदक** म्हणुन परिवहन समिती सदस्य **श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार,सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पूर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. भावेश कुंदनदास चेलानी यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

३. **श्री. भावेश कुंदनदास चेलानी** यांच्या नामनिर्देशन पत्राची छानननी करणेत आली. श्री. भावेश कुंदनदास चेलानी यांच्या नामनिर्देशनपत्रावर **सुचक** म्हणुन परिवहन समिती सदस्य **श्री. मोहन हरीराम रामनानी** (लास्सी) यांनी स्वाक्षरी केली आहे व **अनुमोदक** म्हणुन परिवहन समिती सदस्य **श्री. मनोज कैलाशनाथ पाटील** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रावरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशन पत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे असे उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. भावेश कुंदनदास चेलानी यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

वरीलप्रमाणे एकाच उमेदवाराचे तिनही अर्ज वैध करण्यात आले. छाननीअंती वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. भावेश कुंदनदास चेलानी |

अशा प्रकारे छाननीचे काम सकाळी ११.३५ मि. सुरु करुन सकाळी ११.४४ मि. संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(३) अन्वये ज्या कोणत्याही उमेदवारास आपले नामनिर्देशनपत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी सकाळी ११.४५ ते १२.०० या १५.०० मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली नाही. त्यामुळे **श्री. भावेश कुंदनदास चेलानी** हे एकमेव उमेदवार निवडणूक रिंगणात राहीले. सबब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सभापती पदाकरीता **श्री. भावेश कुंदनदास चेलानी** यांचे एकमेव नामनिर्देशन असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ६(१) अन्वये, पीठासीन अधिकारी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीच्या सभापती पदी सन २०१७—१८ च्या कालावधीसाठी **श्री. भावेश कुंदनदास चेलानी** यांची रितसर बिनविरोध निवड केल्याचे याद्वारे घोषित केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे सुपुर्त करण्यात आले. अभिलेख्याच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले. सभेच्या पुर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. तद्नंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामकाज दुपारी १२.०२ वाजता संपल्याचे जाहिर केले.

दिनांक :—१३/०९/२०१७
स्थान :—स्थायी समिती सभागृह
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर—३

(डॉ. प्रशांत नारनवरे)
पीठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, पालघर
परिवहन समिती सभापती निवड
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर